क्रमांक : बीएमआरडीए/एमटीजी/३७.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

दिनांक : २६ एप्रिल, १९८५

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ८ एप्रिल, १९८५ रोजी झालेल्या सदतिसाव्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

श्री. वि. आसगांवकर
२६/४/८५

( श्र. वि. आसगावकर )
सचिव,
कार्यकारी समिती.

प्रति :

सर्व सदस्य,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी

No.BMRDA/MTG/37.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan, 5th Floor,
Bandra(East), Bombay-400 051.

Date : 26th April, 1985.

The minutes of the 37th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 8th April, 1985 are enclosed.

Sd/- 26/4/1985.
(S. V. ASGAONKAR)
SECRETARY
EXECUTIVE COMMITTEE

To:

All Members.

The Officers of the B.M.R.D.A.

ukd:26485:

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सदतिसाव्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : ८ एप्रिल, १९८५ (सोमवार)

वेळ : संध्याकाळी ४.०० वाजता.

सभास्थान : माननीय मुख्यमंत्र्यांचा समिती कक्ष, (६वा मजला), मंत्रालय

-------

उपस्थित सदस्य :

| | |
|---|---|
| श्री. वसंतराव पाटील, माननीय मुख्यमंत्री आणि नगर विकास मंत्री | अध्यक्ष |
| डॉ. राममनोहर त्रिपाठी, नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री. जे. जी. कांगा, आयुक्त, मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. न. रा. रंगनाथन, शासनाचे सचिव, नगर विकास विभाग | सदस्य |
| श्री. ललित दोशी, शासनाचे सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| श्री. अ. ना. बटब्याल, महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

सुरुवातीस सभाध्यक्षांनी प्राधिकरणाचे माजी सदस्य श्री. युसुफ हाफीज, यांच्या दु:खद निधनाचा उल्लेख केला. या घटनेस अनुलक्षून दिवंगत श्री. युसुफ हाफीज यांनी प्राधिकरणाचा सदस्य या नात्याने बजावलेल्या सेवाकार्याची कृतज्ञतापूर्वक नोंद घेणारा ठराव नंतर प्राधिकरणाने बैठकीत मंजूर केला. (कृपया जोडपत्र पहावे.)

त्यानंतर प्राधिकरणाने कार्यसूचीतील बाबी म्हणजे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (बैठकीच्या कामकाजाचे प्र-चालन) विनियम १९७५ मधील नियम ९ खाली मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रसारण पध्दतीने घेतलेल्या निर्णयांचे अनुसमर्थन करण्यासंबंधीची बाब विचारार्थ घेतली.

चर्चेनंतर प्राधिकरणाने स्वत: अगोदर घेतलेल्या वेगवेगळया निर्णयांमध्ये काही फेरफार घडवून त्यांचे अनुसमर्थन करण्याचे ठरले. त्यानुसार प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

..2/-

ठराव क्र.२८९ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की,मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (बैठकीच्या कामकाजाचे प्र-चालन)विनियम १९७५ मधील नियम ९ खाली या अगोदर प्रसारण पध्दतीने मंजूर केलेल्या ठरावाचे पुढील फेरफाराच्या सापेक्ष हे प्राधिकरण ठराव क्रमांक २७२ ते क्रमांक २८८ याचे अनुसमर्थन करीत आहे.आणि प्राधिकरणाच्या ३५ व्या बैठकीचे कार्यवृत्त व त्यावरील कार्यवाही अहवालही पक्का करीत आहे :-

(१) ठराव क्र.२७६ (बाब क्र.७) हा आहे त्याऐवजी खालीलप्रमाणे स्वीकृत करण्यात यावा :-

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की,दिनांक १ डिसेंबर १९८४ च्या शासकीय पत्र (गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग) क्र.एआरएस १०८४/६२२५/२ मध्ये उल्लेखित अटीबरहुकूम उप-कर लागू असलेल्या जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनः बांधणी मुं.म.प्र.वि.प्रा.अधिनियम १९७४ च्या कलम १३ खाली प्रसृत अधिसूचनेच्या व्याप्तीतून वगळली जावीत.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की,दि.३मार्च १९८४ च्या शासकीय पत्र क्रमांक एफएसआय ११८३/२९५५/यूडी-५ (नगर विकास विभाग) मध्ये उल्लेख असल्याप्रमाणे संपूर्णतया कार्यालयांनी व्यापलेल्या इमारतींची पुनःबांधणी त्याचप्रमाणे दि.२१ जून, १९८४ च्या शासकीय पत्र क्र.एफएसआय ११८३/२९५५/नवि-५मध्ये उल्लेखित,असुरक्षित घोषित केल्याने,त्याच कारणास्तव पाडून टाकल्या जाण्याची बरीच शक्यता असलेल्या इमारतींची पुनःबांधणी अशी विकसने उपरोक्त अधिसूचनेच्या व्याप्तीतून वगळण्याची गरज नाही असे प्राधिकरणाला वाटते आणि प्राधिकरणापुढे जेव्हा जेव्हा तद्विषयक विकसनाचे अर्ज विचारार्थ सादर केले जातील त्यावेळी कार्यकारी समिती प्रत्येक प्रकरणाचा गुणात्मक निकषावर विचार करील."

(२) ठराव क्र.२७७ (बाब क्र.८) हा आहे त्या ऐवजी खालीलप्रमाणे स्वीकृत करण्यात यावा :-

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उक्त विषयासंदर्भात यापूर्वी देण्यात आलेल्या आदेशामध्ये अंशतः फेरफार करुन व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम १३ चे उपकलम (१) खालील प्रयोज्य आणि त्या संदर्भात त्याला सक्षम बनविणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण बाब टिप्पणीला जोडलेली प्रारुप अधिसूचना (जोडपत्र-क) पुढील फेरफाराच्या सापेक्ष निर्गमित करण्यास आपली मान्यता देत आहे :-

(टीपः- संदर्भासाठी कृपया प्रारुप अधिसूचनेच्या इंग्रजी आवृत्तीचे जोडपत्र 'क' पहावे )

405

प्रारुप अधिसूचनेच्या भाग 'ब'मधील परिच्छेद २ मध्ये " (२) शासन किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाकडून........... .......किंवा जनतेकडून वैद्यकीय मदत या आकडे व शब्द रचनेनंतर ....... आणि त्यापुढे ..........चतुः तारांकित हॉटेल." या आकडे व शब्द रचनेआधी पुढील मजकूर अंतर्भूत करण्यात यावा :-

"आणि त्यापुढे दिनांक १.१२.१९८४ च्या शासकीय पत्र (गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग) क्रमांक एआरएस-१०८४/६२२५/२ मध्ये उल्लेख असल्याप्रमाणे उपकर लागू असलेल्या जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी वगळून."

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, वर नमूद केल्याप्रमाणे सुधारीत अधिसूचना महानगर आयुक्तांनी स्वतःच्या सहीनिशी अधिप्रमाणित करुन ती उक्त अधिनियमाच्या कलम ७अ खालील प्रयोज्य शक्तींचा वापर करुन महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकाशित करण्यास याव्दारे त्यांना प्राधिकृत करण्यात यावे."

(३) ठराव क्र.२८२ (बाब क्र.१३) मध्ये पुढील मजकूर परिच्छेद २ म्हणून समाविष्ट करण्यात यावा आणि विद्यमान परिच्छेद २ आणि ३ हे अनुक्रमे परिच्छेद ३ आणि ४ म्हणून वाचण्यात यावेत :-

"त्यापुढे असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, या ठरावाच्या परिच्छेद १ मध्ये देण्यात आलेली मान्यता कशीही असली तरी १९८५-८६ या वित्तीय वर्षात जास्तीत जास्त ५० टक्के पदे भरण्यात यावीत. जर का १९८६-८७ या वर्षात कार्यवाही करावयाच्या कामांचा खर्च रु.६ कोटीहून अधिक होणार असेल तरच गरजेनुरुप बाकीची पदे भरण्यात यावीत."

(४) ठराव क्र.२८४ (बाब क्र.१५) आहे त्या ऐवजी पुढीलप्रमाणे स्वीकृत करण्यात यावा :-

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उक्त विषयासंदर्भात यापूर्वी दिलेल्या आदेशामध्ये फेरफार करुन हे प्राधिकरण मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम ११ चे उप-कलम (२) खाली बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे मुख्य लेखा अधिकारी या पदाची रु.१५००-२२५० ही विद्यमान वेतनश्रेणी रु.2000-२५०० अशी सुधारीत करण्यास याव्दारे मंजुरी देत आहे."

(५) ठराव क्र.२८५ (बाब क्र.१६) आहे त्या ऐवजी पुढीलप्रमाणे स्वीकृत करण्यात यावा :-

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या

...४/-

कलम १२ (१) (क) खालील प्रयोज्य शक्तीचा वापर करुन हे प्राधिकरण बाब टिप्पणीत उल्लेखित मुंबई उपनगर जिल्हयातील पवई आणि तिरंदाज या गावांमधील १०२ हेक्टर भू क्षेत्राच्या विकास योजना प्रस्तावाला, टिप्पणीतील परिच्छेद क्र.३ व ९ मध्ये केलेल्या विवेचनाला आणि परिच्छेद ११ मधील विहीत शर्तींना धरुन आपली तत्वतः मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम १९७६ च्या कलम १०(५) खाली दिनांक २० डिसेंबर १९७८ रोजी अधिसूचित केलेल्या आणि उच्च न्यायालयात खटला दाखल झाल्याने सध्या न्यायप्रविष्ट बनलेल्या आणि ज्यांचा ताबा श्री. अजय मोहन यांच्याकडे आहे त्या तिरंदाज गावातील अनुक्रमे सर्वेक्षण क्र.३१ हिस्सा, ३२ हिस्सा, ३३ हिस्सा, ३४ हिस्सा आणि ३५ हिस्सा यामध्ये समाविष्ट तसेच पवई गावातील सर्वेक्षण क्र.४ हिस्सा व ७ हिस्सा या मध्ये समाविष्ट असलेल्या ७०,५४९.१ चौ. मीटर क्षेत्रफळाच्या जमिनी, त्याबाबत न्यायालयाचा अंतिम निर्णय होईतोवर क्षेत्र विकास योजनेत समाविष्ट केल्या जाऊ नयेत.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि मुंबई महानगरपालिका यानी विहीत केलेल्या प्रमाणबध्दतेनुसार/जमीन मालक पूर्व प्रारंभिक संरचनेची तरतूद करतील आणि अशा पूर्व प्रारंभिक संरचनेची वर उल्लेखित उभय संस्थांकडून छाननी होऊन मान्यता लाभल्याखेरीज जमीन मालकांना विकसनासाठी कार्यारंभ-प्रमाणपत्रे देण्यात येऊ नयेत.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उक्त भू-क्षेत्रात केंद्र सरकारच्या ज्या काही विभागानी भूमी संपादनाला आरंभ केला होता, त्या विभागाना जमीन मालकानी राज्य शासनाचा नगर रचना विभाग जे मूल्य (व्हॅल्यू) निर्धारित करील त्या मूल्याने अंदाजे ५० हेक्टर इतकी जमीन त्यांच्या प्रकल्पाकरिता अग्रक्रमाने उपलब्ध करुन द्यावी लागेल.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, जमीन मालकानी राज्य शासनाला प्रति चौ.फूटला रु.१३५/- या दराने वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकाच्या १५ (पंधरा टक्के) टक्क्याच्या समान असतील इतके गाळे उपलब्ध करुन द्यावे लागतील.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, जमीन मालकानी ४० चौ. मीटर क्षेत्रफळाहून अधिक नाही एवढया आकारमानाचे ५० टक्के गाळे आणि ८० चौ. मीटर क्षेत्रफळाहून अधिक नाही एवढया आकारमानाचे बाकीचे ५० टक्के गाळे बांधून तयार होतील अशा परीमाणाच्या चौकटीतच बांधकामाची कक्षा सीमित ठेवावी.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, क्षेत्र विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी रेखांकित केलेले ढोबळपणे १७ हेक्टर एवढे भू क्षेत्र जमीन मालकानी निःशुल्क, पूर्णतया विकसित स्वरुपात आणि बोजामुक्त असे मुंबई महानगरपालिकेकडे नियोजन प्रस्तावाच्या कार्यवाहीसाठी हस्तांतरित करावे लागेल.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, जमीन मालक प्राधिकरणाचे समाधान होईल अशा प्रकारे योजनांची कार्यवाही करतील या वचनबध्दतेच्या पृष्टयर्थ जमीन मालकांनी प्राधिकरणाशी योग्य तो करारनामा करावा लागेल.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उपरोक्त योजना स्वीकारण्यात जमीन मालकांकडून कसूर झाल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दृष्टीसमोर असलेली सदर क्षेत्र विकास योजना प्राधिकरणाकडून मागे घेण्यात येईल आणि वरील जमिनी नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम १९७६ च्या संबध्द तरतुदीखाली येतील.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उक्त प्रस्तावाच्या कार्यवाहीसाठी योग्य वाटेल अशी कोणतीही भावी कृती करण्यास महानगर आयुक्तांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

(६) ठराव क्रमांक २८६ (बाब क्र.१७) मध्ये पुढील मजकूर परिच्छेद ३ म्हणून समाविष्ट करण्यात यावा आणि विद्यमान परिच्छेद ३ आणि ४ अनुक्रमे परिच्छेद ४ आणि ५ म्हणून वाचण्यात यावेत :

"जर का, कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन यांनी त्यांना वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'इ' ब्लॉकमधील नियत वाटपाने देण्यात आलेले भू खंड क्रमांक सी-१८ आणि सी-१९ यांच्या विक्रीचा देकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या जमीन विक्रीविषयक विनियमांमध्ये घालून दिलेल्या विनिर्दिष्ट कालमर्यादेत स्वीकारला नाही तर सदर देकार मागे घेऊन ते भू खंड भारतीय आयुर्विमा महामंडळाला विकण्याकरिता प्रती चटईक्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.३,२००/- या दराने सदर महामंडळास विक्री-देकार करण्यास प्राधिकरण याव्दारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

सभाध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

-------

जोडपत्र

जोडपत्र

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची सदतिसावी बैठक

दिनांक : ८ एप्रिल, १९८५ (सोमवार)

### ठ रा व

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे माजी सदस्य श्री. युसुफ हाफीज यांचे दिनांक ३ एप्रिल १९८५ रोजी निधन झाले. श्री. युसुफ हाफीज हे २४ डिसेंबर १९८० ते १९ मे १९८३ व नंतर १८ ऑगस्ट १९८४ ते ८ मार्च १९८५ या कालावधीत प्राधिकरणाचे सदस्य होते. सदस्यत्व काळात श्री. युसुफ हाफीज यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला. हे प्राधिकरण दिवंगत श्री. युसुफ हाफीज यांच्या सेवाभावी वृत्तीबद्दल सद्भावना व्यक्त करुन, त्यांच्या दुःखद निधनाने फार मोठी हानी झाली असल्याचे नमूद करीत आहे.

--------

409 / 4-11

MINUTES OF THE THIRTY-SEVENTH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 8th April, 1985 (Monday)

TIME : 4.00 P.M.

PLACE : The Honourable Chief Minister's Committee Room (6th Floor), Mantralaya, Bombay.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri Vasantrao Patil, Hon'ble Chief Minister and Minister for Urban Development. | - Chairman |
| Dr. Rammanohar V. Tripathi, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri J.G. Kanga, Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri N.R. Ranganathan, Secretary to Government, Urban Development Department. | - Member |
| Shri L.N. Doshi, Secretary to Government, Housing and Special Assistance Department. | - Member |
| Shri A.N. Batabyal, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

At the outset, the Chairman referred to the sad demise of Shri Yusuf Hafiz, Ex-Member of the Authority. A resolution placing on record appreciation of services rendered by the late Shri Yusuf Hafiz was then passed by the Authority (Annexure).

The Authority next proceeded with consideration of the item on the Agenda viz. ratification of the decisions taken by circulation, under Regulation 9 of the BMRDA (Conduct of Business at Meetings) Regulations, 1975.

After discussion, it was decided to ratify the various decisions taken after making certain modifications therein. The Authority, accordingly, passed the following Resolution :-

RESOLUTION NO.289 :

"Resolved that the Authority hereby ratifies, under Regulation 9 of the BMRDA (Conduct of Business at Meetings)

Regulations.....

Regulations, 1975, Resolutions, Nos. 272 to 288 and also confirmation of the minutes of the 35th meeting of the Authority and action taken report thereon, passed by circulation, subject to the following modifications :-

(1) That the Resolution No.276 (Item No.7) be instead adopted as under :-

"Resolved that the Authority is of the considered opinion that reconstruction of old and dilapidated cessed buildings as per conditions mentioned in Government letter in Housing Department, No.ARS-1084/6225/2, dated 1.12.1984, be exempted from the purview of the Notification under Section 13 of the BMRDA Act, 1974.

"Resolved further that the Authority is of the considered opinion that the reconstruction of buildings wholly occupied by offices as per Government letter in Urban Development Department, No.FSI 1183/2955/UD-5, dated 3.3.1984 and the reconstruction of buildings likely to be demolished for the reasons of the same having been declared unsafe as per Government letter in Urban Development Department, No.FSI 1183/2955/UD-5, dated 21.6.1984 need not be exempted from the purview of the aforesaid Notification and the Executive Committee shall deal with each such case whenever applications are submitted to BMRDA."

(2) That the Resolution No.277 (Item No.8) be instead adopted as under :-

"Resolved that in partial modification of the earlier orders passed in the matter, the Authority in exercise of its powers conferred by sub-section (1) of Section 13 of the BMRDA Act, 1974 and all other powers enabling it in this behalf approves of the issue of draft Notification (Annexure-C) appended to the Item Note subject to the insertion of the following in Part (B), para.2 thereof after figure and words '(ii) by Government or a Local Authority .......... or medical relief to the public;'

and.....

and before words 'Further excluding..........
four-star hotel;' :-

'And further excluding the reconstruction of old and dilapidated cessed buildings as per Government letter in Housing Department, No.ARS 1084/6225/2, dated 1.12.1984;'

"Resolved further that the Metropolitan Commissioner be authorised to have the Notification published in the Maharashtra Government Gazette duly authenticated under his hand in exercise of the powers conferred by Section 7A of the said Act."

(3) That the following para.2 shall be inserted in Resolution No.282 (Item No.13), and the existing paras.2 and 3 be read as paras. 3 and 4, respectively :-

"Resolved further that notwithstanding the approval accorded in para.1 of this Resolution, at the most 50% of the sanctioned posts be filled in in the financial year 1985-86. In case, works to be executed in the year 1986-87 exceed Rs.6/- crores, the remaining posts shall be filled in as per requirement."

(4) That the Resolution No.284 (Item No.15) be instead adopted as under :-

"Resolved that in modification of the previous orders passed in the matter, the Authority hereby accords sanction, under sub-section (2) of Section 11 of the BMRDA Act, 1974 to the pay-scale of the post of Chief Accounts Officer being revised from Rs.1500-2250 to Rs.2000-2500, as proposed."

(5) That Resolution No.285 (Item No.16) be instead adopted as under :-

"Resolved that in exercise of the powers vested in the Authority under Section 12(1)(c) of the BMRDA Act, 1974, the Authority hereby approves the proposal in principle underlying paragraphs 3 and 9 along with the conditions

prescribed.....

prescribed under the paragraph 11 of the Item Note in respect of the areas admeasuring 102 Hectares in Pawai and Tirandaz villages in Bombay Suburban District.

"Resolved further that the scheme would not cover, till final decision of the Court, the lands held by Shri Ajay Mohan admeasuring 70,549.1 square metres comprised in Survey Nos. 31 Part, 32 Part, 33 Part, 34 Part and 35 of village Tirandaz and Survey Nos. 4 Part and 7 Part of village Pawai as these lands have been notified under Section 10(5) of the Urban Land (Ceiling & Regulations) Act, 1976, on 20.12.1978 and are subjudice in the High Court.

"Resolved further that the land-owners shall provide infrastructure of the standard prescribed by the BMRDA and the Bombay Municipal Corporation and that till it is scrutinised and approved by both these Authorities, no Commencement Certificates shall be issued for the development by the land-owners.

"Resolved further that the land-owners shall make available an area admeasuring about 50 Hectares on priority to the Central Government Departments who had initiated acquisition of land in the area for their projects at the value to be determined by the Town Planning Department of the State Government.

"Resolved further that the land-owners shall give tenements equal to 15% (Fifteen **per cent.**) of the built-up Floor Space Index at the rate of Rs.135/- per sq. ft. to State Government.

"Resolved further that the land-owners shall restrict the size of the tenements so that 50% of the tenements do not exceed 40 square metres and the balance 50% do not exceed 80 square metres.

"Resolved.....

415



"Resolved further that the land-owners shall handover an area admeasuring roughly 17 Hectares earmarked for the public purposes free of cost fully developed and without any encumbrances to the Bombay Municipal Corporation for implementation of the planning proposals.

"Resolved further that the land-owners shall enter into agreement with the Authority undertaking the responsibilities of implementation of schemes to the satisfaction of the Authority.

"Resolved further that if the land-owners fail to accept the aforesaid scheme, the Area Development Scheme contemplated by the BMRDA would be withdrawn and that the lands would come under the provisions of the Urban Land (Ceiling & Regulations) Act, 1976.

"Resolved further that the Metropolitan Commissioner is authorised to take further necessary action for implementation of the said proposal."

(6) That in Resolution No.286 (Item No.17), the following para.3 shall be inserted and the existing paras.3 and 4 be read as paras.4 and 5, respectively :-

"That in case, the Commissioner of Labour, Government of Maharashtra to whom plots Nos.C-18 and C-19 in 'E' Block of Bandra-Kurla Complex are allotted does not accept the offer within the period stipulated in the BMRDA Disposal of Land Regulations, the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to withdraw the offer and offer the said plots to the Life Insurance Corporation of India at the rate of Rs.3,200/- per Floor Space Index square metre."

The meeting then concluded with a vote of thanks to the Chair.

-.-.-.-.-.-.-.-

ukd:26485:

Annexure.....

ANNEXURE

THIRTY-SEVENTH MEETING OF THE B.M.R.D.A.

DATE : 8th April, 1985 (Monday)

RESOLUTION

Shri Yusuf Hafiz, Ex-Member of the Authority has passed away on 3rd April, 1985. Shri Yusuf Hafiz was member of the Authority during the period from 24.12.1980 to 19.5.1983 and 18.8.1984 to 8.3.1985. During this period he evinced a keen interest in the affairs and working of the Authority. The Authority wishes to place on record its appreciation of the services rendered by the late Shri Yusuf Hafiz and also its deep sense of loss as a result of his sad demise.

-.-.-.-.-.-.-.-

ukd:26485: